शपथेवर उलटतपास ॲड. राजेश ठाकुर गैरअर्जदार क्रं. २ तर्फे :—

९. कुलवंत सिंग यांना मी ओळखतो. ते गैरअर्जदार क्रं.१ कंपनीचे मॅनेजर आहेत. घटनास्थळ हे कुलवंतसिंग यांनी पंचनामाचेवेळी पोलीसांना दाखविली होती. हे म्हणणे खरे आहे की, घ टनास्थळ हे कंपनीच्या कार्यालयाच्या वॉशिंग एरियामध्ये आहे. कंपनीचे कार्यालय खदान परीसरात असलयाबाबत माझेकडे कागदपत्र नाही. हे म्हणणे खरे आहे की, कंपनीच्या कार्यालयासमोर रोड आहे. साक्षदार स्वतः सांगतो तो रोड २०० मीटर अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर रोड हा डब्लुसिएलचा रोड आहे व तो खदानीकडे जातो. हे म्हणणे खरे आहे की, सदर खदान ही खुली खदान आहे. हे म्हणणे खरे नाही की, कार्यालयापासुन खदान ही एक ते दिड किलोमिटर अंतरावर आहे.

१०. नि.यु.१७ वर दाखल केलेले आय.डि.कार्ड आता मला दाखविण्यात आले. हे म्हणणे खरे नाही की, सदर माझे आय.डि.कार्ड हे खोटे आहे. हे म्हणणे खरे आहे की, कंपनीमध्ये हजेरी पट राहते. कंपनीमध्ये पगार रजिस्टर ठेवल्या जात नाही. साक्षदार स्वता सांगतो की, कपंनी मार्फत ऑनलाईन पगार दिल्या जातो व कोणत्याही पगार रजिस्टरवर आजपर्यंत माझी कोणतीही सही घेतलया गेली नाही. माझे असे म्हणणे आहे की, कंपनीकडून मला जो पगार मिळाला तो माझे बॅक खात्यावर मिळाला आहे. मी अपघात घडण्यापुर्वी अंदाजे दिड वर्षापासुन कंपनीमध्ये कामावर होतो. घटना घडण्यापुर्वीपासुनचा अंदाजे दिड वर्षाचा पगार माझे बॅक खात्यावर जमा झाला हे दर्शविण्यासाठी आज रोजी माझेकडे कागद उपलब्ध नाही. सदर कागद मला उपलब्ध झाल्यास मी दाखल करण्यास तयार आहे. बॅक पासबुक नि.यु.२६ आता मला दाखविले. हे म्हणणे खरे आहे की, त्यामध्ये घटनापुर्वीच्या कालावधीचा पगार मिळाल्याच्या नोंदी नाही.

११.        हे म्हणणे खरे नाही की, मी गैरअर्जदार क्रं. १ कंपनीकडे कधीही कामावर  नव्हतो.  हे म्हणणे खरे नाही की, अपघात खदान परीसरात झाला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी गैरअर्जदार क्रं.१ कंपनीकडे कामाला नव्हतो त्यामुळे मी हजेरीपट व पगार रजिस्टरच्या प्रती  दाखल केलेल्या नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल केले असुन खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण झाला.** श्रवणोत्तर स्वीकृत

**फेरतपास काही नाही.** **स्वा/—**

(अ. दा. तिडके)
न्यायाधीश
दि. २८.०१.२०२६. कामगार न्यायालय, चंद्रपुर